# जाहिरात

## सेवानिवृत्त लघुलेखक

## विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई

महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई येथील कार्यालयातील लघुलेखक हे पद करार (कंत्राटी) पद्धतीने तात्पुरत्या स्वरूपात ११ महीन्यासाठी भरावयाचे आहे. त्याकरीता खाली विहीत करण्यात आलेल्या पात्रता पूर्ण करणा-या उमेदवारांनी मुलाखतीसाठी **दिनांक २३/१२/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता** विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई- ४०० ६१४ येथे उपस्थित रहावे.

**परिशिष्ट अ**

| अ. क्र. | पद | एकत्रित दरमहा मानधन | उमेदवाराची शैक्षणिक अर्हता व अनुभव | भरावयाचे पद |
|---|---|---|---|---|
| १ | **सेवानिवृत्त लघुलेखक / (पदसंख्या ०१)** | **शासकीय / निमशासकीय सेवा- (निवृत्तीवेतन धारक अधिकारी)** यांचेसाठी करार पद्धतीने नियुक्तीच्या वेळी प्राप्त होणा-या मुळ निवृत्ती वेतनाची रक्कम + महागाई भत्ता + दूरध्वनी व प्रवास खर्च रू. १६,१५० /- (जास्तीत जास्त ) **निवृत्तीवेतनार्ह नसलेल्या निमशासकीय सेवा (निवृत्तीवेतनार्ह नाहीत असे अधिकारी) —** सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेले वेतनाच्या आधारे मानीव निवृत्तीवेतनाची रक्कम + प्रचलित दराने महागाई भत्ता | १. सेवानिवृत्त लघुलेखक असावा.<br>३. सेवानिवृत्त उमेदवाराने लघुटंकलेखनाच्या ( वेग किमान १०० शब्द प्रतिमिनिट) आणि टंकलेखनाच्या (इंग्रजी टंकलेखनाचा वेग किमान ४० शब्द प्रति मिनिट व मराठी टंकलेखनाचा वेग किमान ३० शब्द / प्रति मिनिट ) वेगाचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण केलेले असावे.<br>४.उमेदवार शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा.<br>५. उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असावे.<br>६. सेवानिवृत्त अधिकारी यांच्या विरूद्ध कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू अगर प्रस्तावित नसावी किंवा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.<br>७. सेवानिवृत्त अधिका-याचे या पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्तीचे वेळी ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.<br>८. सेवानिवृत्त अधिकारी यांच्या विरूद्ध कोणतेही न्यायालयीन प्रकरण चालू अगर प्रस्तावित नसावे.<br>९. उमेदवारास संगणकाबाबतचे ज्ञान असावे.<br>१०. उमेदवाराने MS-CIT परिक्षा उत्तीर्ण केलेली असावी.<br>११. शासननिर्णय १३/११/२००३ च्या सुधारणा नियमानुसार नियम ५-८अ नियम ३,४,५, व ६ नमूद पदांवर नियुक्त व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाची अर्हता धारण केलेली असावी. | ०१ |

Scanned with OKEN Scanner

कंत्राटी पद्धतीने सेवानिवृत्त लघुलेखक यांची निवड

**कंत्राटी पद्धतीने सेवानिवृत्त लघुलेखक** यांचे विभागीय आयुक्त हे नियुक्ती प्राधिकारी असतील.

**सर्वसाधारण अटी व शर्ती :-**

| | |
|---|---|
| १) | सदर नेमणूक ही पूर्णत: करार पध्दतीने असेल. संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/ सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/ हक्क असणार नाही. |
| २) | उमेदवार हा महाराष्ट्रातील रहीवासी असावा. |
| ३) | मुलाखतीसाठी येतांना मुळ कागदपत्र आणणे आवश्यक आहे. |
| ४) | करार पध्दतीने नेमणूक करण्यात येणा-या अधिकारी / कर्मचा-यांना एकत्रित मानधन आणि अनुज्ञेय दूरध्वनी व प्रवास खर्चाव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत. |
| ५) | सदर पदासाठी उमेदवाराने आपले संपूर्ण नाव, टपालाचा पूर्ण पत्ता, दूरध्वनी क्रमांक, जन्मतारीख, डोमिसाईल प्रमाणपत्र, शैक्षणिक अर्हता व अनुभव विषयक माहिती (Bio Data) समाविष्ट असेल अशा प्रकारे विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, पहिला मजला, नवी मुंबई ४०० ६१४ यांचे नावे सादर करणे आवश्यक आहे. अर्जासोबत वय, शैक्षणिक अर्हता, जातीचा दाखला व अनुभव याबाबतच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती साक्षांकित करून सादर करावेत. उमेदवाराने अर्जावर आपला सक्षम प्राधिका-याने साक्षांकित केलेला फोटो चिकटवणे आवश्यक आहे. असा अर्ज **दिनांक १७/१२/२०२५** रोजी **दुपारी ३.०० वाजेपर्यंत** कार्यालयीन वेळेत konkanest@gmail.com या ई-मेल वर दाखल करावा. |
| ६) | प्राप्त अर्जांची छाननी करून मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची यादी **दिनांक १९/१२/२०२५ रोजी** सुचना फलकावर प्रसिध्द केली जाईल. अशा मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांना वेगळे मुलाखत पत्र पाठविण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. तथापि आपल्या अर्जात नमूद केलेल्या दूरध्वनी क्रमांकावर संदेश दिला जाईल. तरी आपण अर्जात आपला दूरध्वनी क्रमांक नमूद करावा |
| ७) | या यादीतील पात्र उमेदवारांची **मुलाखत दिनांक २३.१२.२०२५** रोजी **सकाळी ११.०० वाजल्यापासून** घेतली जाईल. |
| ८) | नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारीयांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिका-यांना करार सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील |
| ९) | करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेली नसावी. |
| १०) | नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध जाहीर करणे आवश्यक राहील. |
| ११) | नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्याना प्राप्त होणा-या कागदपत्रे माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील. |
| १२) | एखादया अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष/ अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात यईल. |

Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| १३) | विभागीय आयुक्त, कोकण यांनी कोणताही अर्ज किंवा सर्व अर्ज कोणतेही कारण न दर्शविता रद्द करण्याचे अधिकार राखून ठेवले आहेत. |
| १४) | सदर भरती प्रक्रिया निवडीच्या कोणत्याही स्तरावर स्थगित करणे/ तहकूब करणे/ रद्द करणे इत्यादी अधिकार विभागीय आयुक्त यांनी राखून ठेवले आहेत. |
| १५) | करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील. |
| १६) | नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करतील. |
| १७) | नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करण्यात येणार नाहीत. |

इच्छूक उमेदवारांनी आपले अर्ज **दिनांक १७/१२/२०२५ पर्यंत दुपारी ३.०० वाजेपर्यंत** विहीत कागदपत्रांच्या स्वसाक्षांकीत प्रतींसह konkanest@gmail.com या ईमेल वर कार्यालयीन वेळेत दाखल करावेत.

क्र. मशा/ कार्या-४/इएनजी/ कं.ल.ले.जाहीरात/२०२५
विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय
कोकण भवन, नवी मुंबई
दिनांक :- ०८/१२/२०२५
(स्थळप्रतीवर मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांची स्वाक्षरी असे.)

(वैशाली इंदाणी- उंटवाल)
अपर आयुक्त (महसूल), कोकण विभाग

Scanned with OKEN Scanner